ePaper
| वर्ष - 7 | अंक - 214 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 12 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## "कलम 370 रद्द करण्याचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय घटनाबाह्य", प्रकाश आंबेडकर



### आतील पानांत


- भारत-पाकिस्तान महामुकाबला!
- बस कंडक्टर ते सुपरस्टार
- कांद्यासाठी सरकारचा मेगा प्लॅन!
- सरकारला दुष्काळाचे गांभीर्य नाही!


## पुणेकरांसाठी गुड न्यूज

# शहराला तीन नद्यांमधून मिळणार अतिरिक्त पाणी!

## महापालिका आणि 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ला (पीएमआरडीए) अतिरिक्त पैसे मोजावे लागणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कोकणातील अतिरिक्त पाणी कृष्णा खोऱ्याकडे वळविण्याच्या योजनेमुळे पुणे शहराला अतिरिक्त साडेचार अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी मिळणार आहे. एकीकडे, पुणेकरांचे पाणी पळविण्याचा आरोप सातत्याने होणाऱ्या जलसंपदा विभागाने पुण्याला अतिरिक्त पाणी देण्याची योजना आखली आहे. 'प्रकल्प वर्षां'तर्गत पुण्यासाठी अतिरिक्त पाणी मिळविण्यासाठी महापालिका आणि 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ला (पीएमआरडीए) अतिरिक्त पैसे मोजावे लागणार आहेत.

कृष्णा खोऱ्यातील नद्यांमध्ये कोकणातील अतिरिक्त १५.११ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी विविधप्रकारे पोहोचविण्यात येणार आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील वळण बंधारा उतारावर आहे. हा वळण बंधारा पूर्वेकडील धरणाच्या पातळीपेक्षा उंचीवर आहे. त्यामुळे गुरुत्वाकर्षणाच्या मदतीने बंधाऱ्यातील पाणी बोगद्याद्वारे पूर्वेकडे वाहून नेणे शक्य आहे. मुंबईजवळ माथेरानला पाणीपुरवठा करण्यासाठी हा बंधारा बांधण्यात आला आहे. प्रत्येक नाल्यावर वळण बंधारे बांधणे शक्य नाही. अतिवृष्टीमुळे रस्त्यांची दुरवस्था होऊ नये, यासाठी ताम्हिणी घाटात 'जलअपवर्तन नाली'ची योजना केली आहे. या नाल्यामुळे उंच टेकड्यांवरून वाहत येणारे पाणी जमा होते. हे पाणी नंतर जवळच्या बंधाऱ्यामध्ये वळवून पूर्वेकडे येऊ शकते. वळण बोगद्यासाठी बंधाऱ्याच्या खालील बाजूस योग्य जागेची निवड केली आहे. त्यामुळे पश्चिमेकडील अतिरिक्त पाणी पूर्वेकडील जलाशय आणि नद्यांना येऊन मिळेल. पावसाळ्यात पाणी पूर्वेकडे अखंडपणे स्थलांतरित व्हावे, अशा पद्धतीने बोगद्याचा आकार आणि उतार निश्चित केला आहे.

### तीन प्रकारे नद्यांत पोहोचणार पाणी





### पुण्याला पाणी कसे मिळणार?

- घोसेखांबपासून कोरीगडापर्यंतचे पाणी मुळा-मुठा कंटूर कालव्यात घेऊन पूर्वेकडे मुळशी धरणात सोडणार.
- मुळा-मुठा वळण बंधाऱ्यातील पाणी बोगद्याद्वारे मुळशी जलाशयात सोडण्याचे नियोजन.
- त्याच घाटमाथ्यावरील म्हाशा डोंगरापर्यंत दुसरा कंटूर कालवा प्रस्तावित असून, पाणी दुसऱ्या वळण बंधाऱ्यात संकलित करून पुढे ते पाणी मुळशी जलाशयात सोडले जाईल.
- केतकाई डोंगर, फडाई डोंगरामधील पाणलोट क्षेत्र आंतरक्षेत्रीय करून दुसरा कंटूर कालवा प्रस्तावित आहे. त्यातील पाणी मुळशी जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रातील पिंपरी गावाजवळ सोडण्यात येईल.
- या कंटूर कालव्याच्या पाणलोट क्षेत्रास लागून तिसरे वळण बंधारे हे निवे गावाजवळ बांधण्याचे नियोजन असून, त्यातील पाणी मुळशी जलाशयात सोडण्यात येईल.
- पुढील घाटमाथ्यावर वळण बंधारे; तसेच संतुलन तलाव प्रस्तावित करून त्यातील पाणी वरसगाव धरणात घेण्याचे प्रस्तावित आहे
- घोळ गावाच्या वरील बाजूला संतुलन तलाव, वळण बंधारे, नाले, अशी विविध चार धरणस्थळे प्रस्तावित केली आहेत.

# तळवडे घटने प्रकरणी तीन जणांना बेड्या

## आत्तापर्यंत गेला नऊ जणांचा जीव, सात जणांची प्रकृती चिंताजनक

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी- चिंचवडमधील तळवडे या ठिकाणी स्पार्कल कॅण्डल बनवणाऱ्या कारखान्यामध्ये आग लागून आत्तापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवड पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. शुभांगी सुतार, नजीर अमीर शिकलकर आणि सागर रमेशचंद भक्कड अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. शुक्रवारी तळवडे या ठिकाणी असलेल्या स्पार्कल कॅण्डल बनवणाऱ्या कारखान्यात भीषण आग लागून नऊ महिलांचा मृत्यू झाला तर सात जणांवर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या गंभीर घटने प्रकरणी पिंपरी- चिंचवड पोलिसांनी आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली आहे, तर मुख्य आरोपी शरद सुतार हा दुर्घटनेत गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तळवड्यातील घटना गंभीर असल्याने राजकीय नेते स्थानिक नेते घटनास्थळी भेट देत आहेत.



### मृतांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचणी

दरम्यान, या घटनेत जागीच होरपळून सहा महिलांचा मृत्यू झाला होता. मृतदेह ओळखण्यास देखील शक्य नव्हते, त्या सहा महिलांच्या मृतदेहाची डीएनए चाचणी करण्यात आली असून त्यांची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे. शनिवार आणि रविवार या दिवशी शासकीय सुट्टी असताना पिंपरी- चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी याबाबत पाठपुरावा करून 'डीएनए' चाचणीचे अहवाल मिळवले असून त्या सहा जणांवर आज सोमवारी निगडीतील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद!

## » पदविका अभ्यासक्रमाऐवजी प्रगत अभ्यासक्रम सुरू?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या आराखड्यात बदल केले आहेत. या बदलांची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून केली जाणार आहे.**

त्यामुळे या अभ्यासक्रमांऐवजी महाविद्यालयांना बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रम (फाऊंडेशन), तर पदवीधरांसाठी प्रगत अभ्यासक्रम (अॅडव्हान्स्ड) अभ्यासक्रम सुरू करता येणार असून, पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद होणार आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका अभ्यासक्रम राबवले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने प्रचलित प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका आणि पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नोमेनक्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या



अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीचा अहवालानुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन रचना लागू करण्यास विद्यापीठाने मान्यता दिली. त्यामुळे आता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाऐवजी पायाभूत अभ्यासक्रम, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाऐवजी प्रगत अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. त्या बाबतचे परिपत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. विद्यापीठाचे विभाग, सर्व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांनी सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका व पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान, श्रेयांक, कालावधी, अभ्यासक्रम या बाबतची माहिती ३० डिसेंबरपर्यंत अद्ययावत करावी लागणार आहे. त्यासाठीची सुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत माहिती अद्ययावत न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षापासून अशा अभ्यासक्रमाला मान्यता मिळणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या आराखड्यात बदल केले आहेत. या बदलांची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून केली जाणार आहे.

### पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान

» अभ्यासक्रमांऐवजी महाविद्यालयांना बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पायाभूत अभ्यासक्रम (फाऊंडेशन), तर पदवीधरांसाठी प्रगत अभ्यासक्रम (अॅडव्हान्स्ड) अभ्यासक्रम सुरू करता येणार असून, पारंपरिक पदविका अभ्यासक्रम बंद होणार आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांकडून कौशल्य विकासासाठी विविध प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका अभ्यासक्रम राबवले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने प्रचलित प्रमाणपत्र, प्रगत प्रमाणपत्र, पदविका आणि पदव्युत्तर पदविकाचे नामाभिधान (नोमेनक्लेचर), श्रेयांक, कालावधी आदींबाबत धोरण ठरविण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती.

# शिक्षणावर दूरगामी परिणाम!

## » मुलींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा निर्णय

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**करोना काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दूरगामी परिणाम झालेले आहेत, पालकांच्या स्थलांतरामुळे शाळाबाह्य मुला-मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच राज्यात बालविवाहांचे वाढते प्रमाण चिंताजनक असल्याची भीती व्यक्त करत शालेय शिक्षण विभागाने शालेय मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.**

राज्यातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुला-मुलींची सुरक्षितता, निकोप आणि समतामुलक वातावरण निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक शाळेला समिती स्थापन करावी लागणार आहे. बालहक्क संरक्षण कायद्यानुसार सर्वच बालकांच्या हिताचे, हक्कांचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. सद्यःस्थितीत मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. घर, शाळा आणि समाजात मुला-मुलींना सुरक्षित व बालस्नेही वातावरण मिळावे तसेच त्यांचे सामाजिक, भावनिक, अध्ययन उत्तमरीत्या व्हावे, यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने विविध स्तरावर समित्या गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी, निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने निर्देश दिले आहेत. तसेच समितीचा अहवाल कार्यालयास पाठवण्याच्या सूचनाही विभागीय शिक्षण उपसंचालकांनी दिलेल्या आहेत.राज्यातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुला-मुलींची सुरक्षितता, निकोप आणि समतामुलक वातावरण निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक शाळेला समिती स्थापन करावी लागणार आहे.



### विविध स्तरावर समित्या गठित

» संरक्षण कायद्यानुसार सर्वच बालकांच्या हिताचे, हक्कांचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. सद्यःस्थितीत मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. घर, शाळा आणि समाजात मुला-मुलींना सुरक्षित व बालस्नेही वातावरण मिळावे तसेच त्यांचे सामाजिक, भावनिक, अध्ययन उत्तमरीत्या व्हावे, यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने विविध स्तरावर समित्या गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी, निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने निर्देश दिले आहेत. तसेच समितीचा अहवाल कार्यालयास पाठवण्याच्या सूचनाही विभागीय शिक्षण उपसंचालकांनी दिलेल्या आहेत.

# पुनर्विकासासाठी परवानगी द्या : पुणे संस्थेची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शनिवारवाडा परिसरातील शंभर मीटर परिघातील जुन्या वाड्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी व वाड्यांचा पुनर्विकास करण्यासाठी महापालिकेने विशेष परवानगी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी आपले पुणे संस्थेने केली आहे. पुरातत्व विभागाने शनिवारवाडा परिसरातील बांधकामांवर बंधन घातले आहे. यामुळे या भागातील जुन्या वाड्यांची दुरुस्ती होत नाही, त्यांचा पुनर्विकास केला जाऊ शकत नाही. पुरातत्व विभागाच्या नियमाप्रमाणे नवीन बांधकाम वा दुरुस्ती करणे शक्य नाही. यापूर्वी कसबा पेठेतील जुने वाडे पडणे किंवा काही भाग कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. नुकतेच मोटे मंगल कार्यालयाजवळील महाजन वाडा ही तीन मजली इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. या इमारतीत लोक राहत नसल्याने जीवित हानी झाली नाही. नवीन बांधकाम आणि दुरुस्तीला परवानगी मिळत नसल्याने या भागातील वाड्यांतील रहिवाशांना मुठीत जीव धरून जगावे लागत आहे. ज्या ठिकाणी आता दुरुस्ती करणे, पुनर्विकास करणे गरजे आवश्यक आहे. अशा वाड्यांबाबत महापालिकेने पुढाकार घेतला पाहिजे, अशी मागणी आपले पुणे या संस्थेने केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने एका निकालात हेरिटेज असताना महापालिकेस बांधकामास विशेष परवानगी द्यावी, असे आदेश दिले आहे. या निर्णयाचा आधार घेत पुण्यात काही करता येईल का? पुरातत्व विभागाच्या कायद्यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करता येईल का? विशेष बाब म्हणून या परिसराचा एक एकत्रित प्लान तयार करून तो पुरातत्व विभागाला सादर करून त्यास मंजुरी मिळविता येईल का? याचा विचार महापालिकेने करावा, अशी मागणी संस्थेचे सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे, उज्वल केसकर यांनी केली. नवीन बांधकाम आणि दुरुस्तीला परवानगी मिळत नसल्याने या भागातील वाड्यांतील रहिवाशांना मुठीत जीव धरून जगावे लागत आहे. ज्या ठिकाणी आता दुरुस्ती करणे, पुनर्विकास करणे गरजे आवश्यक आहे. अशा वाड्यांबाबत महापालिकेने पुढाकार घेतला पाहिजे.

# उद्योगनगरीत बर्न हॉस्पिटल उभारा!

## नागपूर हिवाळी अधिवेशन : आमदार महेश लांडगे यांची मागणी

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहर औद्योगिकनगरी म्हणून ओळखले जाते. व्यापारी आणि निवासी तसेच औद्योगिक अस्थापना सर्वाधिक आहेत. मात्र, आगीची दुर्घटना घडल्यास जखमींना तात्काळ उपचार मिळावेत. यासाठी शहरात बर्न हॉस्पिटल उभारावे, अशी आग्रही मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली.**




राज्य विधिमंडळाचे नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. दि. ८ डिसेंबर रोजी पिंपरी-चिंचवडमधील तळवडे येथील ज्योतिबानगर येथे फायर कँडल कंपनीमध्ये आग लागली. त्यामध्ये आतापर्यंत ९ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत आणि उपाययोजना कराव्यात याबाबत सभागृहात चर्चा झाली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांहून अधिक आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) आहे. मात्र, शहरात बर्न वॉर्ड किंवा रुग्णालय नाही. त्यामुळे राज्य सरकारने पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला बर्न हॉस्पिटल किंवा वॉर्ड निर्माण करण्यातबाबत निर्देश देण्यात यावेत, अशी आग्रही सभागृहात केली आहे.

तसेच, तसेच, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी तळवडे आग प्रकरणातील मृतांच्या नातेवाईकांना तातडीने आर्थिक मदत जाहीर केली. याबद्दल आमदार लांडगे यांनी आभारही मानले आहेत.



> तळवडे आग दुर्घटनेतील जखमी आपत्तीग्रस्तांना पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करावे लागले. यापूर्वीही शहरात आगीच्या घटना घडत असतात. गेल्या वर्षभरात आगीत जखमी झालेल्या पिंपरी-चिंचवडमधील १३० हून अधिक रुग्णांना पुण्यात उपचारासाठी जावे लागले. शहरात महापालिकेचे वायसीएम आणि अन्य रुग्णालये आहेत. मात्र, बर्न वॉर्ड सुविधा नाही. एखादी मोठी दुर्घटना घडण्याची प्रतीक्षा करण्यापेक्षा बर्न वॉर्ड सुविधा किंवा आधुनिक उपचार पद्धती असलेले बर्न हॉस्पिटल उभारावे, अशी मागणी केली आहे. तसेच, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनही दिले आहे. याबाबत महायुती सरकार निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास आहे.
>
> **-महेश लांडगे,**
> **आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# जनतेची लूट करणं हा काँग्रेसचा गुणधर्म!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा घणाघात : काँग्रेसचे खासदार धीरज साहू यांच्याविरोधात आंदोलन



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिथे जिथे काँग्रेसची सरकारं असतात तिथे तिथे असे नेते काँग्रेस सरकारच्या माध्यमातून राज्याची, जनतेची लूट करतात. हा काँग्रेसचा गुणधर्मच आहे. याचा पुरावा आपल्याला नुकत्याच झालेल्या राज्यांच्या निवडणुकीत मिळाला. काँग्रेस सरकारच्या भ्रष्टाचाराला आणि मनमानी कारभाराला कंटाळून जनतेने भाजप सरकारला निवडून दिलं. आता झारखंड मधील या २०० कोटीच्या प्रकरणांमुळे काँग्रेस बिलकुलच सुधारली नाहीये हे दिसून येतंय, असा आरोप भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केला आहे.**

६ डिसेंबर २०२३ रोजी आयकर विभागाने मद्य निर्मिती कंपनी बलदेव साहू आणि समूहाच्या झारखंड आणि ओडिशामधील 10 ठिकाणी छापे टाकले. आयकर विभागाने बोलंगीर कार्यालयापासून ३० किमी अंतरावर असलेल्या बलदेव साहू कंपनीच्या सातपुडा कार्यालयावर छापा टाकून २०० कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. काँग्रेसकडून सुरू असलेल्या या भ्रष्टाचाराच्या निषेधार्त भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)च्यावतीने आंदोलन करण्यात आले. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत शहराध्यक्ष शंकर जगताप बोलत होते. यावेळी, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, चिंचवड विधानसभा प्रमुख काळूराम बारणे, विशाल वाळुंजकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शंकर जगताप म्हणाले की, काँग्रेसचे राज्यसभा खासदार धीरज साहू आणि मद्यनिर्मिती कंपनी बलदेव साहू आणि समूहाशी संबंधित उद्योगपती यांच्या निवासस्थानावर आयकर विभागाने छापा टाकला. आयकर विभागाची ही कारवाई सुमारे ३ दिवस बुधवारी सुंदरगढ शहरातील सरगीपाली येथील काही घरे, कार्यालये आणि डिस्टिलरीवर इथे सुरु होती. त्यातून ही रोकड विभागाने जमा केली. त्यातून इतकी जास्त रक्कम आयकर विभागाच्या हाती लागली की त्यांना मुद्दाम नोटा मोजणारी मशिन मागवून घ्यावी लागली. आणि १५७ मोठ्या बॅगांमधून ही रक्कम आयकर विभागाला न्यावी लागली. अनेक बेकायशीर व्यवसाय असलेले धीरज प्रसाद साहू काँग्रेसचे राज्यसभेचे ३ वेळचे खासदार राहिलेले आहेत. शिवाय त्यांचा दारू विक्री आणि गाळण्याचा सुद्धा व्यवसाय आहे.

राज्यसभेची खासदारकी ही राजकारणाच्या पलीकडे सुद्धा माणसाची गुणवत्ता पाहून दिली जाते. पण दारूच्या व्यवसायात असणाऱ्या आणि ज्याच्या अनेक बेकायदेशील व्यवसायांमधून अमाप संपत्ती कमावणाऱ्या व्यक्तीला काँग्रेसने राज्यसभेची खासदारी का दिलेली असेल, याचा विचार भारताच्या जनतेने करावा. परंतु काँग्रेसने कायम अशा भ्रष्टाचारी लोकांना पाठीशी घातलेलं आपल्याला दिसून येईल. महाराष्ट्रात सुद्धा जनतेने भाजपशासित प्रशासन पाहिलं होतं, पण जनतेने दिलेला कौल धुडकावून लावून स्वार्थासाठी एकत्र आलेल्या लोकांचा अडीच वर्षाचा कारभार आपण पाहिला. परंतु ते अनैतिक सरकार उलथवून टाकून जनतेची प्रामाणिकपणे सेवा करण्याची आम्हाला संधी मिळाली आहे.

शंकर जगताप पुढे म्हणाले की, ज्या पद्धतीने UPA सरकार १० वर्षे राज्य करत होते. तेच काँग्रेसचे अजूनही सुरु आहे. UPA च्या अनेक भ्रष्टाचारांची उदाहरणे असल्यामुळे लाज वाटून काँग्रेसने त्यांच्या आघाडीचे नाव बदलले. काँग्रेस सरकारचा कोळसा घोटाळा, 2G घोटाळा, कॉमनवेल्थ गेम्समध्ये केलेला प्रचंड भ्रष्टाचार भारताची जनता विसरलेली नाही. इथे महाराष्ट्रात सुद्धा काँग्रेस सत्तेत होती तेव्हा महाराष्ट्राचा गृह मंत्री १०० कोटी हप्ते मागत फिरत होता. त्या हप्त्यांसाठी सरकारी यंत्रणांचा वापर करत होता. हीच काँग्रेसच्या राजकारणाची पद्धत राहिलेली आहे. देशाला लुबाडणारा काँग्रेसचा 'हात' आहे आणि देशात विकासाची भरभराट करणारं भाजपचं कमळ आहे. देश स्वतःची वैयक्तिक ATM असल्यासारखा या काँग्रेसच्या नेत्यांनी लुटला आहे. आणि आता भारताच्या जनतेला या दोन सरकारांमधला फरक लक्षात आलेला आहे, असेही त्यांनी सांगितले.

> 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' या मोदींच्या शब्दावर विश्वास ठेवून नुकतेच ३ राज्यांत जनतेने काँग्रेसला नाकारत भाजपला प्रचंड बहुमत दिले. याच मुख्य कारण हेच आहे की जनता काँग्रेसच्या या मनमानी, अकार्यक्षम, भ्रष्टाचारी कारभाराला कंटाळली आहे. आणि दुसऱ्या बाजूला त्यांना मोदींच्या गॅरंटीवर विश्वास आहे. काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचाराची गॅरंटी असते आणि जिथे भाजपची सत्ता असते तिथे विकासाची म्हणजेच मोदींची गॅरंटी असते.
>
> **-शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# काँग्रेसने टीकेपेक्षा टक्क्यांकडे पाहावे!




**कल्याणकारी योजना बंद करण्याचे धोरण, राजकीय आकलनाचा अभाव, सामूहिक नेतृत्वाची परंपरा लयाला जाणे, घराणेशाहीचे जोखड आणि राहुल गांधींच्या नेतृत्वाविषयीची नापसंती ही काँग्रेसच्या पराभवामागची मुख्य कारणे आहेत. मात्र ती दूर करण्याऐवजी काँग्रेसचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करण्यातच धन्यता मानताना दिसतात..**



नुकत्याच झालेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर देशाच्या राजकीय पटलावरील काँग्रेस या प्रमुख शक्तीचा आजवरचा प्रवास आणि १९५१ मध्ये जनसंघाच्या रूपाने सुरू झालेला (आता भाजप) राष्ट्रवादी शक्तींचा प्रवास याची तुलना विश्लेषक मंडळी आकडेवारीच्या आधाराने करू लागली आहेत. चार-पाच महिन्यांवर आलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदणीत यशाचे मूल्यमापन करताना काँग्रेसच्या कामगिरीला लागलेल्या ग्रहणाचेही विश्लेषण होऊ लागले आहे. देशाची आणि अनेक राज्यांची सत्ता अनेक वर्षे उपभोगणाऱ्या काँग्रेसच्या कामगिरीचा उतरता आलेख या पक्षाच्या समर्थकांना, या पक्षाविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या पत्रकारांना अस्वस्थ करू लागला आहे. मात्र या उतरत्या आलेखाची कारणे प्रामाणिकपणे शोधण्याऐवजी भारतीय जनता पक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरच असभ्य, अनुचित भाषेत टीका करण्याचा सरधोपट मार्ग या मंडळींनी स्वीकारला आहे. 'हत्ती आणि सात आंधळे' या कथेप्रमाणे काँग्रेस समर्थक, विचारवंत, विश्लेषक भारतीय जनता पक्षाच्या वाढत्या लोकप्रियतेची वेगवेगळी कारणे कथन करू लागले आहेत. त्यांच्या या विश्लेषणातून काय साध्य होत आहे, हे काँग्रेसच्या शीर्षस्थ नेतृत्वाला कळेनासे झाले आहे. आकडेवारीच्या गणितात जाऊन पाहिले तर २००९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाची मतांची टक्केवारी जवळपास दुप्पट झाल्याचे दिसते. मतांच्या टक्केवारीत एवढी वाढ एका रात्रीत होत नाही. एखाद्या पक्षाचा हक्काचा मतदार तयार होणे ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला ७ कोटी ८० लाख मते मिळाली होती. टक्केवारीच्या भाषेत बघायचे झाले तर भारतीय जनता पक्षाला एकूण मतदानाच्या १८.८ टक्के एवढी मते मिळाली होती. २०१४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १७ कोटी १६ लाख मते मिळवली. एकूण मतदानांच्या ३१ टक्के मते मिळवताना भारतीय जनता पक्षाने पाच वर्षांत आपल्या मतांमध्ये अडीचपट वाढ नोंदवण्याचा पराक्रम केला होता. २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाची मतांची टक्केवारी ३७.५ टक्के एवढी झाली. २०१४ च्या निवडणुकीच्या तुलनेत २०१९ मध्ये भाजपच्या मतांमध्ये पाच कोटींची वाढ झाली. आता काँग्रेसच्या कामगिरीकडे पाहू या. २००९ मध्ये काँग्रेसला ११.९ कोटी मते (२८.५ टक्के), २०१४ मध्ये १०.६९ कोटी मते (१९.५ टक्के) तर २०१९ मध्ये ११.९४ कोटी मते (१९ टक्के). याचा अर्थ २००९ ते २०१९ या दहा वर्षांत काँग्रेसची मते जवळपास तेवढीच राहिली. एकूण मतदानांच्या तुलनेत काँग्रेसची टक्केवारी २०१४ आणि २०१९ या दोन्ही लोकसभा निवडणुकांत जवळपास सारखीच होती. एकीकडे भारतीय जनता पक्षाची मते २००९ ते २०१९ या काळात दुप्पट होत असताना काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारीत वाढ झाली नाही, याचा अर्थ सरळ आणि स्पष्ट आहे, या पक्षाला नवीन मतदार आपल्याकडे आकृष्ट करण्यात यश आले नाही. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांत केलेल्या विकासकामांमुळे मतदारांनी, 'फिर एक बार मोदी सरकार', ही घोषणा मतदानातून प्रत्यक्षात आणली. २०१४ नंतर भारतीय जनता पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांच्या संख्येतही वाढ झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणात 'डबल इंजिन सरकार' या शब्दप्रयोगाचा वारंवार वापर होतो. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाची सत्ता असल्यास विकास प्रक्रियेला आणखी गती येते. २०१४ नंतर गोरगरीब, वंचित वर्गासाठी प्रत्यक्षात आलेल्या मोदी सरकारच्या अनेक योजनांना भाजपशासित राज्य सरकारांमुळे आणखी बळ मिळाले. वानगीदाखल 'पंतप्रधान किसान सन्मान निधी योजने'चे उदाहरण घेऊ. या योजनेत केंद्र सरकार दरवर्षी सहा हजार रुपये इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करते.

## संपादकीय »

# नेहरूंना मुक्ती!

***अनुच्छेद ३७०'बाबतचा निर्णय न्यायालयाकडून उलटा फिरण्याची अपेक्षा नव्हतीच. पण आता तरी निवडणूक घ्या, हेही न्यायपालिकेस सांगावे लागले..***

दोन व्यवस्था असणे हेच मुळात व्यवस्थेतील व्यंग होते आणि ते दूर केले जावे आणि जम्मू-काश्मिरास लागू असलेली राज्यघटनेतील 'अनुच्छेद ३७०'ची तरतूद रद्द केली जावी ही सत्ताधारी भाजपची भूमिका होती. त्यानुसार २०१९ साली ५ ऑगस्टला केंद्राने आपल्या धक्काधोरणानुसार तसा निर्णय घेतला. 'लोकसत्ता'ने 'ऐतिहासिक धाडसानंतर' या शीर्षकाच्या संपादकीयातून (६ ऑगस्ट २०१९) या निर्णयावर भाष्य केले होते. केंद्राच्या त्या निर्णयास पुढे न्यायालयात आव्हान दिले गेले. सुमारे पाच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे आव्हान सर्वोच्च न्यायालयाने अखेर फेटाळून लावले आणि केंद्राचा निर्णय रास्त ठरवला. यात अजिबात आश्चर्य नाही. हे निश्चलनीकरणाच्या निर्णयास आव्हान देण्यासारखे म्हणायचे. तसे करू जाणे हे विरजलेल्या दह्याचे पुन्हा दुधात रूपांतर करण्याइतके अशक्यप्राय.

**काश्मीर भारतात सामील झालं तेव्हाची वस्तुस्थिती आजच्या भाजपनेत्यांनी पाहिलेली नाहीच, पण काश्मीरमधील सशस्त्र कारवाई आवरती घेण्याला सरदार पटेल यांच्यासह त्या वेळच्या नेत्यांचाही पाठिंबा होता, 'युनो'त नेण्याच्या निर्णयानंतरही तीनदा बहुमत नेहरूंच्या बाजूनं राहिलं, हेही पाहायचं नाही?**

# काश्मीरकडे 'नेहरूंची घोडचूक'

केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी काश्मीरबाबत बोलताना 'नेहरूंनी घोडचूक केली' असं वक्तव्य संसदेत केलं आणि गदारोळ झाला. अपेक्षेप्रमाणे काँग्रेसजनांनी विरोध केला. शहांनी नेहरूंचच पत्र वाचून दाखवल्यामुळे वातावरण तापलं. तत्कालीन परिस्थितीत नेहरूंनी घेतलेला निर्णय संयुक्त राष्ट्र संघटनेवर विश्वास ठेवून घेतला होता, पण त्यांचा भ्रमनिरास झाल्यावर त्यांनी हे पत्र लिहिलं. 'युद्धविराम केला नसता तर पाकव्याप्त काश्मीरचा प्रश्नच उदभवला नसता' असं आता म्हणणं म्हणजे 'आत्याबाईला मिशा असत्या तर...' म्हणण्यासारखंच आहे, त्यामुळे तो मुद्दा सोडून देऊ. मात्र त्यानंतरही नेहरूंना तीनवेळा जनतेने निवडून दिलं याचा अर्थच त्यांचं हे करणं कोणालाही खुपलं नाही, असाच अर्थ निघतो. आजच्या विरोधी पक्षीयांना 'लोकांनी तुम्हाला नाकारले आहे...' असं भर संसदेत सुनावणारे विद्यमान सत्ताधारी, नेहरूंना मिळालेल्या जनादेशाची मात्र दखलही घेत नाहीत!



आता त्या वेळची वस्तुस्थिती पाहू. काश्मीर संस्थानचे त्यावेळचे महाराजा हरिसिंग यांना दोन्ही दगडांवर पाय ठेवायची दुर्बुद्धी झाली आणि त्यांनी भारत किंवा पाकिस्तानात विलीन न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानातून जेव्हा टोळीवाले काश्मिरात घुसले. त्यांनी काश्मीरचा बराच भाग ताब्यात घेतल्यावर राजा हरिसिंग यांना जाग आली आणि त्यांनी लॉर्ड माउंटबॅटनना साकडं घातलं. माउंटबॅटन यांनी त्यांना भारतात सामील होण्याचा सल्ला दिला. हरिसिंग यांना पर्यायच नव्हता. सामीलनाम्यावर सह्या झाल्यानंतर भारतीय सैन्याने काश्मिरात कारवाई केली व टोळीवाले आणि पाकिस्तान्यांना बरेच मागे रेटले. युद्ध सुरू ठेवायचं तर आणखी कुमक हवी होती, पण ते शक्य नव्हतं म्हणून वल्लभभाई पटेलांनीही युद्धबंदीला मान्यता दिली. त्यावेळेपर्यंत संयुक्त राष्ट्र संघटना (त्या वेळचे लघुरूप 'युनो') म्हणजे कचकड्याची बाहुली आहे, हे सिद्ध व्हायचं होतं म्हणून नेहरूंनी विश्वासाने युनोत प्रश्न नेला आणि काश्मिरात सार्वमताची मागणी केली, त्या वेळी युनोने ठराव केला की काश्मीरमधील टोळीवाले पाकिस्तानने हटवावे, भारताने नाममात्र लष्कर काश्मिरात ठेवावे व त्यानंतर युनोच्या देखरेखीखाली सार्वमत घ्यावे. पाकिस्तानचे तेव्हाचे पंतप्रधान लियाकत अली याला तयार झाले पण हटवादी जिनांनी हा तोडगा नाकारला. जिनांना हैदराबादचा केक हवा होता व काश्मीरही खायचे होते. कारण त्यावेळेस वल्लभभाई पटेल 'काश्मीर तुम्ही घ्या व हैद्राबाद आम्हाला द्या' या निष्कर्षाप्रत आले होते (हा उल्लेख 'सरदार पटेल शताब्दी ग्रंथा'च्या पहिल्या खंडात आहे), पण काश्मीर हा नेहरूंचा सॉफ्टकॉर्नर असल्यामुळे हा तोडगा मागे पडला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# इथेनॉल निर्मितीची 35 हजार कोटींची गुंतवणूक अडचणीत येण्याची शक्यता!

## निर्णयाचा केंद्र सरकारने फेरविचार करावा : अजित पवार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इथेनॉल निर्मितीत ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक साखर कारखान्यांनी केली आहे. ७ डिसेंबर रोजी केंद्र सरकारने उसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मितीवर बंदी घातल्यामुळे हा उद्योगच अडचणीत येतो आहे.**

सरकारने घेतलेला निर्णय ग्राहक व अन्नपुरवठा विभागाच्या दृष्टीने योग्य असला, तरी उसाच्या उद्योगात हजारो शेतकरी गुंतलेले आहेत. त्यामुळे या निर्णयाचा केंद्र सरकारने फेरविचार करावा, अशी मागणी अजित पवार यांनी केली आहे. केंद्र सरकारने बी हेवी इथेनॉलच्या किमती उसाच्या रसापासून थेट इथेनॉल तयार करण्याच्या इथेनॉलला द्याव्यात. सी दर्जाच्या इथेनॉलची किंमत बी हेवीच्या दर्जाची करावी यातून आर्थिक संतुलन साधता येईल, असे सांगत अजित पवार यांनी ऊस उत्पादकांची बाजू उचलून धरली आहे. दरम्यान, उसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मिती करण्यावर बंदी घातली आहे. हा निर्णय रद्द



करावा, अशी मागणी विस्मा इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. ठोंबरे यांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे, की केंद्र सरकारने उसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मितीवर बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय साखर कारखान्यांसाठी अतिशय धक्कादायक आहे. हा निर्णय पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्यासाठी शासनाने जे धोरण ठरवले होते त्या धोरणाच्या विरोधात आहे. शासनाने परवानगी दिल्यामुळे एप्रिल २०२४ पर्यंत उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीचे करार झाले असून, १ नोव्हेंबरपासून अनेक साखर कारखान्यांनी उत्पादन सुरू केले आहे व काही प्रमाणात मालाचा पुरवठाही केला आहे. यामध्ये खासगी साखर कारखान्यांनी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली आहे. बंदीच्या निर्णयामुळे ही गुंतवणूक तशीच पडून राहील व व्याजाचा भुर्दंड कारखान्यांना सहन करावा लागेल.

### उद्योगात हजारो शेतकरी गुंतलेले

इथेनॉल निर्मितीसाठी बँकांच्या कर्जाचे पुनर्गठन करून नव्याने कर्ज घेतले, ते साखर कारखानेही आता अडचणीत येणार आहेत. इथेनॉल निर्मितीत ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक साखर कारखान्यांनी केली आहे. केंद्र सरकारने उसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मितीवर बंदी घातल्यामुळे हा उद्योगच अडचणीत येतो आहे. सरकारने घेतलेला निर्णय ग्राहक व अन्नपुरवठा विभागाच्या दृष्टीने योग्य असला, तरी उसाच्या उद्योगात हजारो शेतकरी गुंतलेले आहेत.

# सरकारला दुष्काळाचे गांभीर्य नाही!

## पीक विमा धोरण शेतकऱ्यांना संकटात टाकणारे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात अवकाळी आणि दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहत असताना सत्ताधारी मात्र शेजारील राज्यात प्रचारात मग्न होते. पीक विमा योजनेत वाटा मिळत असल्याने सरकार विमा कंपन्यांचे लाड करीत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी विधानसभेत केला.**



अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी सरकारने भरीव मदत जाहीर करून त्याला कर्जमुक्त करण्याची मागणी सत्ताधारी आणि विरोधकांनी केली. विधानसभेत विरोधक आणि सत्ताधारी पक्षाने राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत चर्चा उपस्थित केली होती. त्यावर सत्ताधारी आणि विरोधकांनी दुष्काळ, पाणीटंचाई, अवकाळी पाऊस, गारपीट, पिकविमा कंपन्यांची मुजोरी, निर्यात बंदीचा फटका, बोगस बियाणे आणि शेतकऱ्यांना मदतीच्या मुद्द्यावरून सरकारला घेरले. सरकारने ज्या ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे ते सत्ताधारी आमदारांचे असून त्यातील २९ तालुके मंत्र्यांचे आहेत. सरकारने तोंड पाहून दुष्काळ जाहीर केल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. या संकटातून बळीराजाला बाहेर काढण्यासाठी सरकारने बळीराजाला कर्जमुक्त करावे, ४० दुष्काळी तालुक्यांप्रमाणे टंचाईसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या एक हजार २१ महसुली मंडळांना लाभ द्यावेत, पिकाच्या वर्गवारीनुसार मदत देताना जिरायतीसाठी हेक्टरी ५० हजार तर बागायतीसाठी हेक्टरी एक लाख रुपयांची मदत करावी, शेतकऱ्यांना बिनव्याजी पीक कर्ज द्यावे, वीज बिल माफ करावे, राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करावा, पिकविम्याची मदत द्यावी आदी मागण्या यावेळी वडेट्टीवार यांनी हा प्रस्ताव मांडताना केल्या. राष्ट्रवादीच्या जयंत पाटील यांनी सरकारवर टीकेची झोड उठवताना डबल इंजिन सरकारला तिसरे इंजिन जोडल्यामुळे महायुतीची गाडी सुसाट धावेल अशी अपेक्षा होती. मात्र तिसऱ्या इंजिनमुळे सरकारचा त्रास वाढल्याचे सांगितले. पीक विमा कंपन्या नफा कमावण्यासाठी आहेत. हा धंदा बंद करून शासनाची कंपनी स्थापन करण्याची मागणी भाजपचे रणधीर सावरकर यांनी केली. पोकरा योजना अतिशय चांगली, पण त्यात लोकप्रतिनिधींचे मत घेतले जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बच्चू कडू यांनी सरकारला पाठिंबा दिला ही चूक झाली असे सांगत सरकारवर टीका केली. अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी सरकारने भरीव मदत जाहीर करून त्याला कर्जमुक्त करण्याची मागणी सत्ताधारी आणि विरोधकांनी केली. विधानसभेत विरोधक आणि सत्ताधारी पक्षाने राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत चर्चा उपस्थित केली होती. त्यावर सत्ताधारी आणि विरोधकांनी दुष्काळ, पाणीटंचाई, अवकाळी पाऊस, गारपीट, पिकविमा कंपन्यांची मुजोरी, निर्यात बंदीचा फटका, बोगस बियाणे आणि शेतकऱ्यांना मदतीच्या मुद्द्यावरून सरकारला घेरले. सरकारने ज्या ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे ते सत्ताधारी आमदारांचे असून त्यातील २९ तालुके मंत्र्यांचे आहेत.

# उदय सामंत यांच्यावर शिवसैनिकांची नाराजी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्याचे उद्योगमंत्री आणि रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांना रायगडच्या शिवसैनिकांनीच घरचा आहेर दिला आहे. रायगडमधील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सामंत यांच्या कारभाराबाबत जाहीर नाराजी व्यक्त केली. पालकमंत्री असूनही ते जिल्ह्यात पक्षवाढीसाठी कुठलेच प्रयत्न करत नाहीत आणि उद्योगमंत्री असूनही जिल्ह्यातील बेरोजगारी दूर करण्यासाठी देखील प्रयत्न करीत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. शिवसेना नेते मंगेश सातमकर यांच्या उपस्थितीत शिवसेना जिल्हा कार्यकारिणीची बैठक अलिबाग येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी थेट पालकमंत्री उदय सामंत यांनाच लक्ष्य केले. राज्यात आपली सत्ता आहे. आमचे पालकमंत्री उदय सामंत हे स्वत: उद्योगमंत्री आहेत. असे असताना जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मेळावा आयोजित करत नाहीत. जिल्ह्यात अनेक उद्योग आहेत, परंतु आमचे उद्योगमंत्री असूनही आम्हाला नोकरी किंवा सीएसआर फंड मिळत नसल्याची खंत राजा केणी यांनी व्यक्त केली. पालकमंत्री उदय सामंत कधी येतात कधी जातात समजत नाही. जिल्ह्यातील शिवसैनिकांशी त्यांचा संवाद नाही. पालकमंत्री असूनही कधी पक्षवाढीसाठी प्रयत्न करताना दिसत नाहीत, अशा शब्दात राजा केणी यांनी नाराजी व्यक्त केली. जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांनीही आपल्या भाषणात केणी यांची री ओढली. उद्योगमंत्री आमच्याकडे पाहिजे तसे लक्ष देत नाहीत. एखादी जाहीर सभा किंवा पदाधिकारी यांच्या कामाचा आढावा कधी घेतला नाही. आम्ही जिल्हाप्रमुख असताना जिल्ह्यातील तरुणांना रोजगार देण्याचा आम्ही यशस्वी प्रयत्न केला. आज सत्ता आहे, उद्योगमंत्री आपले पालकमंत्री आहेत, असे असताना आपल्याला न्याय मिळणार नसेल तर आपल्यासारखे दुर्दैवी आपणच म्हणावे लागेल.

# राज्यसभेत ‘इंडिया’ महाआघाडीची कोंडी!

## द्रमुक खासदाराच्या काश्मीर भूमिकेमुळे गदारोळ

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**जम्मू आणि काश्मीरला स्वयंनिर्णयाचा अधिकार असल्याचा आक्षेपार्ह मुद्दा ‘द्रमुक’चे खासदार महम्मद अब्दुल्ला यांनी सोमवारी राज्यसभेत उपस्थित करून काँग्रेससह ‘इंडिया’च्या घटक पक्षांची कोंडी केली. अखेर अब्दुल्ला यांच्या विधानाशी काँग्रेस सहमत नसल्याचे स्पष्टीकरण खासदार व पक्षाचे माध्यम विभागप्रमुख जयराम रमेश यांना द्यावे लागले.**





तमिळनाडूतील ज्येष्ठ समाजसुधारक पेरियार यांचे हे विधान अब्दुल्ला यांनी राज्यसभेत जसेच्या तसे उद्धृत केले. त्याला सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी तसेच, सभापती जगदीश धनखड यांनी तीव्र आक्षेप घेतला.‘अब्दुल्ला यांचे विधान संविधानविरोधी, देशाच्या अखंडतेलाच नव्हे तर, देशाच्या अस्तित्वाला आव्हान देणारे असून अशी आक्षेपार्ह विधाने खपवून घेतली जाणार नाहीत’, असे संतप्त मत व्यक्त करत धनखड यांनी अब्दुल्लांचे भाषण तात्काळ थांबवले. राज्यसभेत सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी जम्मू आणि काश्मीर आरक्षण दुरुस्ती विधेयक व जम्मू आणि काश्मीर फेररचना विधेयक अशी दोन विधेयके मांडली. या विधेयकांवरील चर्चेदरम्यान द्रमुकचे खासदार मोहम्मद अब्दुल्ला यांच्या विधानामुळे सभागृहात गदारोळ झाला. तुम्ही संपूर्ण इंडिया महाआघाडीच्या वतीने ही भूमिका मांडत आहात की, फक्त द्रमुकची भूमिका मांडत आहात’, असा प्रतिप्रश्न करून तिरुची शिवा यांची पंचाईत केली. त्यावर, ‘आम्ही संविधान मानतो. देशाच्या अखंडतेला बाधा निर्माण करण्याचा द्रमुकचा कोणताही प्रयत्न नाही’, असे शिवा म्हणाले. सभागृहाचे नेते व केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी काँग्रेसला लक्ष्य केले. द्रमुक खासदाराच्या भूमिकेशी काँग्रेस पाठिंबा आहे का, याचे स्पष्टीकरण विरोधी पक्षनेत्यांनी द्यावे, अशी मागणी गोयल यांनी केली. नियमबाह्य असेल तर कामकाजातून काढून टाकावे पण, त्यांना बोलू न देणे योग्य नव्हे. अब्दुल्लांच्या म्हणण्यावर तुमचे चाणक्य (अमित शहा) उत्तर देण्यास समर्थ आहेत’, असा टोमणा खरगे यांनी मारला. त्यानंतरही भाजपच्या सदस्यांनी काँग्रेसवर हल्लाबोल चालू ठेवला. त्यामुळे नाइलाजाने काँग्रेसचे जयराम रमेश यांनी, अब्दुल्ला यांच्या भूमिकेशी सहमत नाही, असे स्पष्टीकरण दिले. द्रमुकचे गटनेते तिरुची शिवा यांनी पक्षाची बाजू कशीबशी सावरण्याचा प्रयत्न केला. पण,‘अब्दुल्ला यांच्या सामान्य विधानाचा बाऊ केला जात आहे. ‘इंडिया’ महाआघाडी सत्तेवर आल्यावर तिने अनुच्छेद ३७० पुन्हा बहाल केले तर..’, असा मुद्दा शिवा यांनी उपस्थित केल्यामुळे भाजपच्या हाती कोलित मिळाले. जम्मू-काश्मीरला योग्य वेळी संपूर्ण राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्यात येईल, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत सोमवारी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहशतवादमुक्त नव्या आणि उन्नत जम्मू-काश्मीरच्या उभारणीची सुरूवात झाली आहे, असेही शहा यांनी नमूद केले. अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचेही त्यांनी स्वागत केले आणि म्हणाले की आता फक्त एकच संविधान, एक राष्ट्रध्वज आणि एक पंतप्रधान असेल. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच अंतर्गत भाग आहे आणि तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, असेही शहा म्हणाले. अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर जम्मू आणि काश्मीरध्ये झालेला बदल ते पाहू शकत नाहीत, अशी टीका करीत शहा यांनी विरोधकांवर हल्ला चढवला. काश्मीर प्रश्न हाताळण्यात पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी चूक केली होती, हे आज संपूर्ण देशाला माहीत झाले आहे, असेही ते म्हणाले. जम्मू-काश्मीरशी संबंधित दोन नव्या विधेयकांवरील चर्चेला उत्तर देताना शहा म्हणाले की जम्मू-कश्मीर विधानसभेत पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांना २४ जागांचे आरक्षण मिळणार आहे.

### काश्मीर विधेयके संसदेत मंजूर

जम्मू आणि काश्मीरशी संबंधित दोन विधेयके सोमवारी संसदेत मंजूर करण्यात आली. राज्यसभेने आवाजी मतदानाने या विधेयकांना मंजुरी दिली. जम्मू-काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक आणि जम्मू-काश्मीर आरक्षण (दुरुस्ती) विधेयक मंजूर करण्यात आले. या विधेयकांनुसार काश्मीरी स्थलांतरीत समाजातील दोन सदस्यांची तर पाकिस्तानव्याप्त काश्मीरातून विस्थापित झालेल्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एका सदस्यांची विधान परिषदेत नियुक्ती करण्यात येईल. ही दोन्ही विधेयके गेल्या आठवडयात मंजूर झाली होती.

# कांद्यासाठी सरकारचा मेगा प्लॅन!

## शेतकऱ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी (ONION EXPORT BAN) घातल्याने महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन करत आहेत. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर केंद्राने आपली भूमिका जाहीर केली आहे. केंद्र सरकार आता शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी बफर स्टॉकमध्ये वाढ करणार असून त्यासाठी सर्व मंड्यांमधून सुमारे दोन लाख टन कांदा खरेदी करणार आहे.**



त्यामुळे देशांतर्गत घाऊक दर स्थिर राहतील. दुसरीकडे सरकारने सांगितले की किरकोळ बाजारातील किमती वाढू नये म्हणून बफर स्टॉकचा वापर केला जाईल. प्रसारमाध्यमांना माहिती देताना ग्राहक व्यवहार खात्याचे सचिव रोहित कुमार सिंग म्हणाले की, सरकारी खरेदी सुरू असल्याने कांद्याच्या निर्यातबंदीचा शेतकऱ्यांवर कोणताही परिणाम होणार नाही. या वर्षी आतापर्यंत आम्ही 5.10 लाख टन कांदा खरेदी केला असून सुमारे दोन लाख टन अधिक खरीप कांदा पिकाची खरेदी केली जाणार आहे. सामान्यत: सरकार रब्बी कांद्याची गुणवत्ता लक्षात घेऊन खरेदी करते, जो जास्त काळ टिकतो आणि खराब होत नाही. मात्र शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि किरकोळ बाजारातील भाववाढ रोखण्यासाठी सरकार पहिल्यांदाच खरीप कांदा पिकाची खरेदी करणार आहे. बफर स्टॉक राखण्यासाठी आणि देशांतर्गत उपलब्धता वाढवण्यासाठी तसेच कांद्याची किंमत वाढ रोखण्यासाठी सरकारकडून बाजारातील हस्तक्षेप वाढवण्यात येत आहे. त्या माध्यमातून सरकार कांदा खरेदी करत आहे. सरकारने 2023-24 या आर्थिक वर्षासाठी कांद्याच्या बफर स्टॉकचे उद्दिष्ट सात लाख टनांपर्यंत वाढवले आहे. तर गेल्या वर्षी वास्तविक साठा केवळ तीन लाख टन होता. ग्राहक व्यवहार खात्याचे सचिव रोहित कुमार सिंग यांच्या म्हणण्यानुसार, बफर स्टॉकसाठी शेतकऱ्यांकडून सुमारे 5.10 लाख टन कांदा खरेदी करण्यात आला आहे.

# धीरज साहूंकडे इतके पैसे कुठून आले?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

झारखंडमधील काँग्रेसचे राज्यसभा खासदार धीरज साहू यांचं निवासस्थान आणि कंपनीच्या कार्यालयांसह दहा ठिकाणांवर प्राप्तीकर विभागाने छापा मारला होता. या छापेमारीत ३५४ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. धीरज साहू यांच्या घरात आणि कंपनीच्या कार्यालयामधील कपाटांमध्ये कोट्यवधी रुपये ठासून भरले होते. प्राप्तीकर विभागाच्या अधिकाऱ्यांना या नोटा मोजण्यासाठी तब्बल पाच दिवस लागले. या कारवाईवरून भारतीय जनता पार्टीने काँग्रेस पक्षावर निशाणा साधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून सर्वच भाजपा नेते साहू यांच्यासह काँग्रेस पक्षावर टीका करत आहेत. साहू यांच्याकडे इतके पैसे कुठून आले असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. यावर अखेर काँग्रेसने प्रतिक्रिया दिली आहे. धीरज साहू यांच्यावर कारवाई होत असताना त्यांचा पक्ष म्हणजेच काँग्रेसने त्यांचा कुठल्याही प्रकारे बचाव केला नाही. उलट काँग्रेस नेत्यांनी या प्रकरणापासून स्वतःला वेगळं ठेवलं आहे. काँग्रेसचे सचिव आणि खासदार जयराम रमेश यांनी काँग्रेसकडून सर्वप्रथम यावर भाष्य केलं. जयराम रमेश यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, खासदार धीरज साहू यांच्या व्यवसायाशी काँग्रेस पक्षाचा काहीही संबंध नाही. या संपत्तीबाबत फक्त साहूच सांगू शकतात.

# बस कंडक्टर ते सुपरस्टार

थलायवा रजनीकांत (RAJINIKANTH) हे दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आहे. रजनीकांत आज आपला 73 वा वाढदिवस साजरा करत आहेत. मराठी कुटुंबात जन्माला आलेल्या रजनीकांत यांना साऊथमध्ये देवाचा दर्जा दिला जातो. जगभरात त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. रजनीकांत यांनी आपल्या करिअरमध्ये एका पेक्षा एक सिनेमांत काम केलं आहे. थलायवाचा आजही बोलबाला कायम आहे. अभिनयक्षेत्रात येण्याआधी रजनीकांत यांनी कंडक्टर म्हणून काम केलं आहे. रजनीकांत यांच्या 'जेलर' (JAILER) या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कामगिरी केली आहे. सिनेसृष्टीत पदार्पण करण्याआधी रजनीकांत कंडक्टर म्हणून काम करायचे. हिरो व्हायचं त्यांचं स्वप्न होतं. हिरो होण्याचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांचे मित्र राज बहादुर यांनी त्यांना साथ दिली आहे. राज बहादुर यांनी रजनीकांत यांना मद्रास फिल्म इंस्टिट्यूटमध्ये प्रवेश घेण्याला सल्ला दिला होता. रजनीकांत यांना 1975 मध्ये 'अपूर्वा रागनगाल' या सिनेमाच्या माध्यमातून पहिला ब्रेक मिळाला. पण 1983 मध्ये आलेल्या 'अंधा कानून' या सिनेमामुळे त्यांना लोकप्रियता मिळाली. रजनीकांत यांनी हिंदी, कन्नड, तेलुगू, बंगाली भाषेतील सिनेमांत काम केलं आहे. रजनीकांत हे भारतातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते आहेत. भारताबाहेरही त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. जगातील सर्वाधिक मोठा चाहता वर्ग असलेला अभिनेता म्हणून गिनिज बुकमध्ये त्यांचं नाव नोंदवण्यात आलं आहे. रजनीकांत यांनी राजकारणातही एन्ट्री घेतली होती.



# 'त्या' सीनवर बॉबीनं सोडलं मौन!




ॲनिमल' हा सिनेमा गेल्या दहा दिवसांपासून बॉक्स ऑफिसवर राज्य करत आहे. या चित्रपटाने अनेक रेकॉर्ड मोडले. पण तितकाच वादही या चित्रपटामुळे झाला आहे. चित्रपटातील अनेक सीन्सवर प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त करत आक्षेप घेतला आहे. यातच सर्वात जास्त चर्चा झाली ती बॉबी देओलच्या लग्नातल्या सीनची. चित्रपटात लग्नानंतर त्याने आपल्या पत्नीवर वैवाहिक बलात्कार केल्यानं अनेकांनी या सीनवर टीका केली आहे. ॲनिमल मधला तो सीन म्हणजे , 'बॉबी देओल आपल्या लग्नात एकाला यमसदनी धाडतो आणि भर लग्नात बायकोसोबत मधुचंद्र देखील साजरा करतो.' तेही लग्नात आलेल्या पाहूण्यांसमोर. या सीननंतर प्रेक्षकांनी चित्रपटावर टीका केली होती. यापुर्वी या सीनबाबत बॉबीच्या पत्नीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री मानसी टक्सक हिने तिचं मत व्यक्त केलंय होतं. आता यावर बॉबी देओलने आपलं मत व्यक्त केलं आहे. बॉलीवूड बबलला दिलेल्या मुलाखतीदरम्यान बॉबीने सांगितले की, हा सीन चित्रित करताना मला जराही संकोच वाटला नाही. तो म्हणतो, "ज्या क्षणापासून मी माझ्या व्यक्तिरेखेबद्दल ऐकलं, तेव्हापासून मला माहित होतं की मी एक शब्दही न बोलता त्यात बरेच काही करू शकतो. प्रत्यक्षात, एकही शब्द न बोलल्यामुळे मला एक प्रकारची ऊर्जा मिळाली ज्यामुळे माझ्यातली कला बाहेर आली. जेव्हा मी परफॉर्म करत होतो, तेव्हा मला कोणत्याही प्रकारचा संकोच वाटत नव्हता. आपल्या पात्राबद्दल बोलताना बॉबी म्हणाला, "मी ते पात्र साकारत होतो जो क्रूर आहे, जो एक दुष्ट माणूस आहे आणि तो आपल्या स्त्रियांना अशी वागणूक देतो, तो तसाच आहे. आणि मी ते तसेच चित्रित केले आहे. तो त्याच्या तीन बायकांसोबत खरोखर रोमँटिक होता." आता बॉबीच्या या वक्तव्यांची सोशल मिडियावर चर्चा आहे. 'ॲनिमल'च्या कमाईबद्दल बोलायचं झालं तर, या चित्रपटाने रिलीजच्या अवघ्या 10 दिवसांत 430 कोटींहून अधिक कमाई केली आहे तर जगभरात 'ॲनिमल'ने 660 कोटींहून अधिकचीच कमाई केली.

# समंथानं दिली गूडन्यूज!

साऊथची लोकप्रिय अभिनेत्री समंथा ही नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत राहणारी सेलिब्रेटी आहे. तिने आता बॉलीवूडमध्ये देखील मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळवली आहे. मनोज वाजपेयीच्या द फॅमिली मॅन नंतर समंथाची बॉलिवूडमध्येही लोकप्रियता वाढली. समंथा नेहमी सोशल मिडियावर सक्रिय असते. सध्या तिचे सिनेमे हिट होत नसले तर तिच्या लोकप्रियतेवर याचा काहीही परिणाम झालेला नाही. समंथा नागासोबतच्या घटस्फोटाच्या बातम्यामुळेही बरीच चर्चेत असते. आता मात्र समंथानं चाहत्यांसोबत एक गोड बातमी शेयर केली आहे. समंथा रुथ प्रभूने तिच्या चाहत्यांना एक खास भेट दिली आहे. समंथा रुथ प्रभूने तिच्या नव्या प्रोडक्शन हाऊसची घोषणा केली.

# तापसीचा रोमँटिक अंदाज

अभिनेता शाहरुख खानच्या (SHAH RUKH KHAN) डंकी (DUNKI) या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांच्या या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या ट्रेलरला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आता या चित्रपटातील 'ओ माही' हे गाणं रिलीज झालं आहे. या गाण्यात तापसी पन्नू (TAPSEE PANNU) आणि शाहरुख खान यांच्या केमिस्ट्रीनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.डंकी या चित्रपटातील 'ओ माही' या गाण्यामध्ये हार्डी आणि मनू म्हणजेच शाहरुख आणि तापसी यांचा रोमँटिक अंदाज बघायला मिळत आहे. 'ओ माही' हे गाणे अरिजीत सिंहनं गायलं आहे. तर प्रीतमनं या गाण्याला संगीत दिलं आहे. इरशाद कामिल हे या गाण्याचे गीतकार आहेत. गाण्यात हार्डी आणि मनू यांच्यातील प्रेम दिसत आहे. काही दिवसांपूर्वी डंकी या चित्रपटमधील लूट पूट गया हे गाणं रिलीज झालं होतं. या गाण्यात देखील हार्डी आणि मनू यांची लव्ह स्टोरी दाखवण्यात आली. हे गाणं सोशल मीडियावर व्हायरल झालं. अनेक नेटकऱ्यांनी या गाण्यावरील रिल्स सोशल मीडियावर शेअर केले. अशातच आता डंकी चित्रपटातील 'ओ माही' या गाण्याला देखील प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. बोमन ईरानी, तापसी पन्नू, विकी कौशल, विक्रम कोचर आणि अनिल ग्रोवर यांनी देखील डंकी या चित्रपट काम केलं आहे. हा चित्रपट 21 डिसेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शाहरुख हा त्याच्या चाहत्यांच्या 2023 या वर्षाचा शेवट मनोरंजनानं करणार आहे.



# नानी आणि मृणालच्या हाय नन्ना' नं जिंकली प्रेक्षकांची मनं

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता नानीचा (NANI) 'हाय नन्ना' (HI NANNA) हा चित्रपट 7 डिसेंबर रोजी रिलीज झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. 'हाय नन्ना' हा चित्रपट रिलीज होऊन पाच दिवस झाले आहेत. या पाच दिवसांत या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर 25 कोटींचा टप्पा पार केला आहे. SACNILK च्या रिपोर्टनुसार, 'हाय नन्ना' या चित्रपटाने 4.9 कोटींची ओपनिंग केली होती. तर दुसऱ्या दिवशी या चित्रपटानं 4.05 कोटींची कमाई केली आणि तिसऱ्या दिवशी या चित्रपटाने 7.6 कोटींचे कलेक्शन केलं आहे. तसेच चौथ्या दिवशी या चित्रपटाने 8 कोटींची कमाई केली आहे. पाचव्या दिवशी या चित्रपटानं 1.55 कोटींची कमाई केली आहे. आता या चित्रपटाचं पाच दिवसाचं एकूण कलेक्शन



26.1 कोटी एवढे झाले आहे. 'हाय नन्ना' या चित्रपटामध्ये नानीने सेलिब्रिटी फोटोग्राफर विराजची भूमिका साकारली आहे. विराज हा त्याच्या सहा वर्षांची मुलगी माहीसोबत मुंबईत राहतो. त्याला आपल्या मुलीसाठी एक परफेक्ट वडील व्हायचे आहे. विराज, आजोबा (जयराम), पाळीव कुत्रा प्लुटो आणि विराज (नानी)चा मित्र जस्टिन हे सर्वजण माहीचे जवळचे लोक असतात. या चित्रपटात नानीसोबत अभिनेत्री मृणाल ठाकूरने देखील प्रमुख भूमिका साकारली आहे. मृणाल आणि नानी यांच्या ऑनस्क्रीन केमिस्ट्रीने लोकांची मने जिंकली आहेत. याशिवाय या चित्रपटात अभिनेत्री श्रुती हासनचीही महत्त्वाची भूमिका आहे. शौर्यव यांनी 'हाय नन्ना' या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटाचं अनेकांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करुन कौतुक केलं आहे. नानीच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पसंती मिळते. त्याचा दसरा हा चित्रपट एप्रिल महिन्यात रिलीज झाला होता. या चित्रपटानं देखील बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात किर्ती सुरेशनं देखील प्रमुख भूमिका साकारली होती.

# भारत-पाकिस्तान महामुकाबला!

## अंडर-19 विश्वचषक 2024चे वेळपत्रक जाहीर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पुरुषांच्या अंडर-१९ विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. ही स्पर्धा १९ जानेवारीपासून सुरू होत आहे. अंतिम सामना ११ फेब्रुवारीला होणार आहे. या कालावधीत एकूण ४१ सामने खेळवले जाणार आहेत. भारतीय संघ २० जानेवारीपासून येथे आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. सध्या टीम इंडिया दुबईमध्ये १९ वर्षाखालील आशिया चषकात खेळत आहेत. सुपर-६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात महामुकाबला पाहायला मिळू शकतो.**





आयसीसीने सोमवारी संध्याकाळी अंडर-१९ विश्वचषकाचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले. यावेळी विश्वचषकात चार गट करण्यात आले आहेत. चारही गटात प्रत्येकी चार संघ ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक संघ त्यांच्या गटातील उर्वरित तीन संघांविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळेल. चारही गटांतील अव्वल ३ संघ पुढील फेरीत प्रवेश करतील. म्हणजेच दुसऱ्या फेरीत एकूण १२ संघ असतील. येथे प्रत्येक संघ दुसऱ्या गटातील दोन संघांसह प्रत्येकी एक सामना खेळेल. म्हणजेच या फेरीत प्रत्येक संघाचे दोन सामने होतील. यानंतर सर्वोतम-४ संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. सेमीफायनल आणि फायनलसाठीही राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. ग्रुप स्टेजमध्ये भारतीय संघ पहिला सामना बांगलादेशविरुद्ध २० जानेवारीला, दुसरा सामना २५ जानेवारीला आयर्लंडशी आणि तिसरा सामना २८ जानेवारीला अमेरिकेविरुद्ध खेळणार आहे. ही स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत होणार आहे. हे सर्व सामने येथील पाच मैदानांवर खेळवले जातील. १९ वर्षाखालील विश्वचषक २०२४ मध्ये एकूण १६ संघ सहभागी होणार असून हा विश्वचषक तीन टप्प्यात खेळवला जाणार आहे. अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, भारत, आयर्लंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे या देशांना विश्वचषकासाठी थेट प्रवेश मिळाला आहे. उर्वरित पाच संघ क्षेत्रीय पात्रता फेरीद्वारे निश्चित करण्यात आले. नामिबिया, न्यूझीलंड, नेपाळ, स्कॉटलंड आणि यूएसए यांना प्रादेशिक पात्रता फेरीतून प्रवेश मिळाला. १९८८ पासून अंडर-१९ वर्ल्ड कपचे आयोजन केले जात आहे. हे १९९८ पासून दर दुसऱ्या वर्षी आयोजित केले जाते. भारतीय संघ हा अंडर-१९ विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे. टीम इंडियाने २०००, २००८, २०१२, २०१८ आणि २०२२ मध्ये अंडर-१९ वर्ल्ड कपवर नाव कोरले आहे. याशिवाय २०१६ आणि २०२० मध्ये भारत उपविजेता ठरला आहे. आयसीसीने सोमवारी संध्याकाळी अंडर-१९ विश्वचषकाचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले. यावेळी विश्वचषकात चार गट करण्यात आले आहेत. चारही गटात प्रत्येकी चार संघ ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक संघ त्यांच्या गटातील उर्वरित तीन संघांविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळेल. चारही गटांतील अव्वल ३ संघ पुढील फेरीत प्रवेश करतील. म्हणजेच दुसऱ्या फेरीत एकूण १२ संघ असतील. येथे प्रत्येक संघ दुसऱ्या गटातील दोन संघांसह प्रत्येकी एक सामना खेळेल.

### 16 संघ सहभागी होणार आहेत

१९ वर्षाखालील विश्वचषक २०२४ मध्ये एकूण १६ संघ सहभागी होणार असून हा विश्वचषक तीन टप्प्यात खेळवला जाणार आहे. अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, भारत, आयर्लंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे या देशांना विश्वचषकासाठी थेट प्रवेश मिळाला आहे. उर्वरित पाच संघ क्षेत्रीय पात्रता फेरीद्वारे निश्चित करण्यात आले. नामिबिया, न्यूझीलंड, नेपाळ, स्कॉटलंड आणि यूएसए यांना प्रादेशिक पात्रता फेरीतून प्रवेश मिळाला.

# भारताविरुद्धच्या कसोटीसाठी इंग्लंड संघ जाहीर

## तीन अनकॅप्ड खेळाडूंचा समावेश; जाणून घ्या संपूर्ण वेळापत्रक

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत दौऱ्यासाठी इंग्लंडने कसोटी संघ जाहीर केला आहे. १६ सदस्यीय संघाचे नेतृत्व बेन स्टोक्सच्या हाती देण्यात आले आहे. अष्टपैलू ख्रिस वोक्सला स्थान मिळाले नाही. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाच्या निवडकर्त्यांनी तीन अनकॅप्ड खेळाडूंना संधी दिली आहे. वेगवान गोलंदाज गस ॲटकिन्सनशिवाय टॉम हार्टली आणि शोएब बशीर या दोन फिरकी गोलंदाजांची निवड करण्यात आली.**






भारत दौऱ्यासाठी इंग्लंडने फिरकी विभागावर अधिक काम केले आहे. चार फिरकीपटूंच्या उपस्थितीमुळे इंग्लंडच्या फिरकी विभागात बरीच विविधता आहे. डावखुरा फिरकीपटू जॅक लीचचा राखीव म्हणून हार्टलीची निवड करण्यात आली आहे. रेहान अहमदचे संघात पुनरागमन झाले आहे. तो उजव्या हाताचा लेग स्पिनर आहे. तर, शोएब बशीर हा उजव्या हाताचा ऑफस्पिन गोलंदाज आहे. हार्टले इंग्लंडकडून दोन एकदिवसीय सामने खेळला आहे. लँकेशायरसाठी त्याने २० प्रथम श्रेणी सामन्यात ४० विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, २० वर्षीय बशीरने २०२३ मध्ये सॉमरसेटसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने सहा सामन्यांत १० विकेट्स घेतल्या आहेत. हार्टले आणि बशीर हे दोघेही गेल्या महिन्यात संयुक्त अरब अमिरातीमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या इंग्लंड लायन्स संघाचा भाग होते.

दोन्ही खेळाडूंना प्रथमच कसोटी सामना खेळण्याची संधी मिळू शकते. अनुभवी जेम्स अँडरसन, मार्क वुड, ऑली रॉबिन्सन आणि ॲटकिन्सन यांच्या रूपाने इंग्लंडकडे वेगवान गोलंदाजीचे फक्त चार पर्याय आहेत. ॲशेसमध्ये खेळलेल्या ख्रिस वोक्सला वगळण्यात आले आहे. कर्णधार बेन स्टोक्स गोलंदाजी करू शकणार की फक्त फलंदाज म्हणून खेळणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. गेल्या महिन्यात त्याच्या डाव्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली. इंग्लंडकडे जॉनी बेअरस्टो आणि बेन फोक्स हे दोन विकेटकीपिंगचे पर्याय आहेत. भारत दौऱ्यावर इंग्लंड संघ पाच कसोटी सामने खेळणार आहे. पहिला कसोटी सामना २५ जानेवारीपासून हैदराबादमध्ये खेळवला जाणार आहे. यानंतर दुसरी चाचणी २ फेब्रुवारीपासून विशाखापट्टणम येथे होणार आहे. तिसरा कसोटी सामना १५ फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये खेळवला जाणार आहे. चौथा कसोटी सामना २३ फेब्रुवारीपासून रांची येथे होणार आहे. त्याचबरोबर या मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना ७ मार्चपासून धरमशाला येथे खेळवला जाणार आहे.

### इंग्लंड संघात चार वेगवान गोलंदाज

अनुभवी जेम्स अँडरसन, मार्क वुड, ऑली रॉबिन्सन आणि ॲटकिन्सन यांच्या रूपाने इंग्लंडकडे वेगवान गोलंदाजीचे फक्त चार पर्याय आहेत. ॲशेसमध्ये खेळलेल्या ख्रिस वोक्सला वगळण्यात आले आहे. कर्णधार बेन स्टोक्स गोलंदाजी करू शकणार की फक्त फलंदाज म्हणून खेळणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. गेल्या महिन्यात त्याच्या डाव्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली. इंग्लंडकडे जॉनी बेअरस्टो आणि बेन फोक्स हे दोन विकेटकीपिंगचे पर्याय आहेत. हार्टले इंग्लंडकडून दोन एकदिवसीय सामने खेळला आहे. लँकेशायरसाठी त्याने २० प्रथम श्रेणी सामन्यात ४० विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, २० वर्षीय बशीरने २०२३ मध्ये सॉमरसेटसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने सहा सामन्यांत १० विकेट्स घेतल्या आहेत. हार्टले आणि बशीर हे दोघेही गेल्या महिन्यात संयुक्त अरब अमिरातीमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या इंग्लंड लायन्स संघाचा भाग होते. दोन्ही खेळाडूंना प्रथमच कसोटी सामना खेळण्याची संधी मिळू शकते.